निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
२७ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३६१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे


### महाराष्ट्र झेपावतोय ट्रिलियन डॉलरच्या दिशेने

# जगातील १३ वी मोठी अर्थव्यवस्था होण्याचा निर्धार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** महाराष्ट्र ही केवळ देशाची आर्थिक राजधानी नाही, तर आता ती जगाच्या नकाशावर १३ व्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून झळकणार आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या भविष्यातील प्रगतीचा हुंकार भरला. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासाचा 'रोडमॅप' सादर केला आणि विरोधकांच्या टीकेचा समाचार घेतला.

**'शेतकरी, तरुण आणि गुंतवणूक आमचे केंद्रस्थान' – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विरोधकांना सडेतोड उत्तर**

आकडेवारीतून मांडली प्रगतीची 'फिगर'

मुख्यमंत्र्यांनी अत्यंत आक्रमकपणे राज्याच्या आर्थिक ताकदीचा पाढा वाचला. ते म्हणाले:

५१ लाख कोटींची अर्थव्यवस्था: २०१२-१३ मध्ये १३ लाख कोटी असणारी अर्थव्यवस्था आज ५१ लाख कोटींवर (६६० बिलियन डॉलर्स) पोहोचली आहे.जीडीपीमध्ये सिंहाचा वाटा: देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १३.८ टक्क्यांवरून आता १४ टक्क्यांच्या उंबरठ्यावर आहे.वित्तीय शिस्त: कर्ज घेण्याचे प्रमाण सर्वोत्तम राखत वित्तीय तूट २.५ टक्क्यांच्या खाली ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

**गुंतवणूक आणि रोजगाराचा 'महामार्ग'**

दावोस करार म्हणजे केवळ कागदी घोडे नाहीत, तर ती प्रत्यक्ष कृती आहे, असे ठणकावून सांगत त्यांनी गुंतवणुकीचा हिशोब दिला.

**परकीय गुंतवणूक** (FDI): देशातील एकूण एफडीआयपैकी तब्बल ३९ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात येत असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.

**दावोसचे यशः** २०२६ साठी ३१ लाख कोटींचे करार झाले असून, त्यापैकी ८३ टक्के परकीय गुंतवणूक आहे. मायक्रोसॉफ्ट आणि गुगल सारख्या कंपन्या राज्यात पाय रोवत आहेत.

**स्टार्टअप कॅपिटलः** देशातील २५% युनिकॉर्न आणि २०% स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत.

राज्यात बेरोजगारीचा दर ३.१ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. दरवर्षी १० लाख रोजगारांचे आमचे लक्ष्य असून लवकरच सरकारी नोकऱ्यांमधील दीड लाखांचा टप्पा आपण ओलांडू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बळीराजासाठी 'डिजिटल कवच'**

शेतकरी प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पिकविमा आणि मदतीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी 'ग्रीस्टॅक' द्वारे डिजिटल जमीन नोंदणी केली जात आहे.शेतकऱ्यांच्या खात्यात १५,४७२ कोटी रुपये थेट (DBT) जमा झाले आहेत.

योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.कृषी पंपांच्या बाबतीत एका महिन्यात ५० हजार पंप बसवून महाराष्ट्राने



'गिनीज बुक'मध्ये नोंद केली आहे.

गडचिरोली आता 'स्टील सिटी'; कुंभमेळ्याने होणार ब्रँडिंग

नक्षलग्रस्त गडचिरोलीचे चित्र बदलत असून, आता तो जिल्हा 'स्टील सिटी' म्हणून ओळखला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, आगामी नाशिक कुंभमेळ्याचा वापर महाराष्ट्राचे जागतिक स्तरावर 'ब्रँडिंग' करण्यासाठी केला जाईल, ज्यामुळे पर्यटन आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल.

**मराठीच राहणार सत्तेची भाषा!**

भाषेच्या मुद्द्यावरून निर्माण झालेला गोंधळ दूर करताना मुख्यमंत्री स्पष्ट म्हणाले, महाराष्ट्र धर्माचे रक्षण करत असताना मराठी हीच राज्याची सत्तेची भाषा राहील. इतर भाषांचा पर्याय असला तरी मराठीला धक्का लागणार नाही.

शेवटी कवितेतून विरोधकांना इशारा

आपल्या भाषणाचा शेवट मुख्यमंत्र्यांनी अत्यंत प्रभावी ओळींनी केला:

खुदसे जितने की जिद है मेरी, मुझे खुदको ही हराना है

मै भीड नहीं हू दुनिया की, मेरे अंदर भी जमाना है

या शब्दांत त्यांनी स्वतःच्याच विक्रमांना मागे टाकत महाराष्ट्राला जागतिक महासत्ता बनवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## संक्षिप्त

### वन विभागात माजी सैनिकांची भरती

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राज्याच्या वन विभागात माजी सैनिक / माजी सैनिक महिला यांची भरती दि.१६ ते २० मार्च दरम्यान भरती कार्यालय मैदानावर होणार आहे. ही भरती फक्त महाराष्ट्रातील माजी सैनिक/ माजी सैनिक महिलांसाठी मर्यादीत आहे. या संधीचा संबंधितांनी लाभ घ्यावा. अधिक माहिती साठी ९१६८१६८१३६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने कळविले आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन २ मार्च रोजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजीत केला जातो. मार्च महिन्यात सोमवार दि.२ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजीत करण्यात आला आहे.हा लोकशाही दिन सोमवार दि.२ रोजी दुपारी १२ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात होईल. तक्रारदारांनी आपले अर्ज प्रथम तालुका लोकशाही दिनात सादर करवे. त्यानंतर एक महिन्यांनी टोकन पावती जोडून जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी. तक्रार दाखल करतांन अर्ज विहित नमून्यात असावा. तक्रार, निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. तालुकास्तरावर दाखल केल्याची पोहोच पावती सोबत जोडावी. लोकशाही दिनी न्याय प्रविष्ठ प्रकरणे, राजस्व अपिल, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, यापूवी लोकशाही दिनात दाखल केलेले अर्ज स्विकारले जात नाहीत. तरी तक्रारदारांनी आपली तक्रार दाखल करावी असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

# पैठणच्या नाथषष्ठी यात्रेसाठी प्रशासन सज्ज

### भाविकांना स्वच्छता, सुरक्षा आणि दर्जेदार सेवा द्या - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** पैठण येथील जगप्रसिद्ध संत एकनाथ महाराज नाथषष्ठी यात्रोत्सवाचा २२७ वा सोहळा यंदा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या यात्रेसाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाने स्वच्छता, सुरक्षा आणि सेवा या त्रिसूत्रीवर भर देऊन सज्ज राहावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. पैठण येथे आयोजित पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते.



नाथषष्ठी ही महाराष्ट्राची मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. वारकरी आणि भाविकांना कोणतीही उणीव भासू नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे.
**- दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी**

यंदाच्या नाथषष्ठी सोहळ्याचे नियोजन खालीलप्रमाणे असेल:

**प्रारंभः** ५ मार्च (तुकाराम बीज मुहूर्तावर).

**मुख्य सोहळाः** ९, १० आणि ११ मार्च (षष्ठी, सप्तमी व अष्टमी).

**परंपराः** या उत्सवाचे हे २२७ वे वर्ष आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले प्रमुख निर्देश

जिल्हाधिकारी स्वामी यांनी भाविकांच्या सोयीसाठी विविध विभागांना खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत:

**पाणीपुरवठाः** यात्रा काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी किमान २५ टँकर्स ३ दिवस अहोरात्र तैनात ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**स्नान व्यवस्थाः** पवित्र स्नानासाठी जायकवाडी धरणातून योग्य प्रमाणात पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.

**स्वच्छता व आरोग्यः** फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे आणि शहरात चोवीस तास स्वच्छता राखण्यासाठी पथके नेमण्याचे निर्देश नगरपालिकेला दिले आहेत.

**वाहतूक व वीजः** गावाबाहेर तात्पुरते बसस्थानक उभारणे, वाहतूक मार्गात आवश्यक बदल करणे आणि संपूर्ण यात्रा परिसरात अखंडित विद्युत पुरवठा राहील याची दक्षता घेण्यास सांगितले आहे.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, सहायक गटविकास अधिकारी राजेश कांबळे, जलसंपदा विभागाच्या उप-अभियंता श्रद्धा निंबाळकर, मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# सरकारी खुर्ची उबवायची की गावचं राजकारण करायचं?

### परतूर कृषी कार्यालयातील 'त्या' मंडळ अधिकाऱ्याचा ग्रामसभेत राडा!

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)** शासकीय सेवेचा पगार घ्यायचा, जनतेची कामं करण्यासाठी सरकारने नियुक्ती करायची, पण साहेबांना मात्र ओढ लागलीय ती गावच्या राजकारणाची! परतूर कृषी कार्यालयातील आष्टी मंडळ अधिकारी सांगवे यांचा एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, शासकीय कामकाज वाऱ्यावर सोडून गावच्या ग्रामसभेत 'वकिली' करणाऱ्या या महाशयांविरुद्ध आता संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणावर उपविभागीय अधिकारी रोडगे आणि कृषी अधिकारी साळवे मॅडम कारवाईसाठी नक्की कोणाच्या आदेशाची वाट पाहत आहेत? असा संतप्त सवाल जनता विचारत आहे.

**शासनाचे नियम फक्त सामान्यांसाठीच का?**
पगार सरकारचा घ्यायचा आणि चाकरी गावच्या नेत्यांची करायची, हे आता खपवून घेतले जाणार नाही.
**- संतप्त नागरिक**

मिळालेल्या माहितीनुसार, मंडळ अधिकारी सांगवे हे आपल्या पदाचा आणि अधिकाराचा विसर पडल्यासारखे वागत आहेत. चक्क शासकीय कर्तव्यावर असताना रजा टाकून हे महाशय आपल्या गावच्या ग्रामसभेत हजेरी लावतात. गावच्या विकासासाठी की स्वतःच्या फायद्यासाठी? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

ग्रामसभेत जेव्हा सामान्य नागरिकांनी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आणि कामाचा हिशोब मागितला, तेव्हा या कृषी अधिकाऱ्याचा 'गावकीचा' उमाळा बाहेर आला. शासकीय कर्मचारी असूनही त्यांनी हातात माईक घेऊन चक्क भ्रष्ट कारभाराची वकिली केली. एवढेच नाही तर प्रश्न विचारणाऱ्या ग्रामस्थांना धमकीवजा उत्तरे देऊन दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

**सांगवे साहेब,तुम्ही अधिकारी की राजकीय हस्तक?**

या संदर्भात जेव्हा सांगवे यांना विचारणा करण्यात आली, तेव्हा त्यांनी मी गावचा नागरिक आहे, म्हणून उपस्थित होतो असे अजब तर्कट मांडले. राज्यात ५० टक्क्यांहून अधिक सरकारी कर्मचारी ग्रामीण भागातील आहेत, पण ते कधीही आपले कर्तव्य सोडून



ग्रामसभेत राजकारण करायला जात नाहीत. मग सांगवे यांनाच हा विशेष अधिकार कोणी दिला? शासकीय नियमानुसार कर्मचाऱ्यांनी जनतेला न्याय द्यायचा असतो, ना की गावच्या राजकारणात लुडबूड करून स्वतःचा स्वार्थ साधायचा!

**प्रशासकीय चुप्पी का?**

परतूर कृषी कार्यालयातील हा धक्कादायक प्रकार चव्हाट्यावर येऊनही वरिष्ठ अधिकारी गप्प का आहेत?एसडीओ रोडगे साहेब, अशा बेशिस्त अधिकाऱ्यावर चौकशी करून कारवाईचा बडगा कधी उगारणार?कृषी अधिकारी साळवे मॅडम, आपल्या विभागाची प्रतिमा मलीन करणाऱ्या या कर्मचाऱ्याला अभय का दिले जात आहे?

# पैठणमध्ये 'पार्किंग माफियांचा' उच्छाद; भाविकांच्या खिशावर दरोडा, प्रशासन झोपलेय की सामील?

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/प्रतिनिधी/**दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र पैठण नगरीत सध्या भक्तीचा नाही, तर 'लुटीचा' बाजार भरला आहे. संत एकनाथ महाराज समाधी मंदिर परिसरात दर्शनासाठी आणि गोदावरीच्या तीरावर दशक्रिया विधीसाठी येणाऱ्या भाविकांना पार्किंगच्या नावाखाली अक्षरशः लुटले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही लूट चक्क बनावट पावत्यांच्या आधारे सुरू असूनही नगरपालिका आणि पोलीस प्रशासन याकडे डोळेझाक करत आहे.

भाविकांच्या श्रद्धेचा असा बाजार मांडणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. ही लूट थांबली नाही, तर आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल.
**- संतप्त नागरिक, पैठण.**

**बनावट पावत्या अन् जबरदस्तीची वसुली**

मिळालेल्या माहितीनुसार, श्री ज्ञानेश्वर मंदिर ट्रस्ट किंवा संत एकनाथ मल्टीसर्विसेस अशा नावांच्या बनावट पावत्या छापून ही अवैध वसुली सुरू आहे. प्रत्येक वाहनाकडून ५० रुपये सक्तीने उकळले जात आहेत. दिवसभरात किमान १५ ते २० हजार रुपयांची काळी कमाई या माध्यमातून पार्किंग माफियांच्या खिशात जात आहे. श्रद्धेपोटी येणाऱ्या भाविकांना धमकावून हे पैसे वसूल केले जात असल्याने संतांच्या भूमीत 'गुंडगिरी' फोफावली आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' मौन?**

यापूर्वी दशक्रिया विधीचा नैवेद्य ठेवण्यासाठी शिडीच्या नावाखाली १०० ते १५० रुपये लुटले जात होते. 'एक्सप्रेस' वृत्तपत्राने हा प्रकार चव्हाट्यावर आणल्यानंतर तो बंद झाला. मात्र, आता हा नवीन 'पार्किंगचा धंदा' जोमाने सुरू झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, हे सर्व प्रकार प्रशासनाच्या नाकाखाली घडत असून, नगरपालिका आणि पोलीस प्रशासन हेतुपुरस्सर याकडे दुर्लक्ष करत आहे. या मागे कोणाचे वरदहस्त आहेत,



याची चर्चा आता रंगू लागली आहे.

**ठळक मुद्देः लुटीचा 'पॅटर्न'**

बनावट पावत्या: मंदिर ट्रस्टच्या नावाचा गैरवापर करून अधिकृत वाटतील अशा पावत्यांचा वापर.

दररोजची कमाई: १५ ते २० हजार रुपयांची अवैध लूट.

लक्ष्य: परगावचे भाविक आणि दशक्रिया विधीसाठी येणारे शोकाकुल नातेवाईक.

प्रशासकीय निष्काळजीपणा: तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई नाही.

**आमदारांकडे साकडे; आता तरी न्याय मिळणार?**

स्थानिक नागरिकांनी या गंभीर समस्येबाबत नवनिर्वाचित आमदार विलास बापू भुमरे यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले आहे. पवित्र भूमीचे नाव खराब करणाऱ्या या पार्किंग माफियांचा बंदोबस्त करा, अशी आर्त हाक भाविकांनी दिली आहे. आता नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी या माफियांच्या मुसक्या आवळणार की ही लूट अशीच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार करा; जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याने मोठी प्रगती केली असून, जिल्ह्यातील ८७५ पैकी ४८५ ग्रामपंचायती क्षयमुक्त झाल्या आहेत. आता उर्वरित ३९० ग्रामपंचायतींमध्ये हा कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवून संपूर्ण जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या विविध समित्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.बैठकीत मिळालेल्या माहिती नुसार, जिल्ह्यात आता पर्यंत ४ लाख ४१ हजार १८१ संशयित व्यक्तींची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २४ हजार ३३८ संशयित रुग्णांची क्ष-किरण व प्रयोगशाळा चाचणी होणे बाकी आहे.

नवे निर्देश: जिल्हाधिकाऱ्यांनी या सर्व चाचण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी केवळ शासकीयच नव्हे, तर खाजगी प्रयोगशाळांचीही मदत घेण्याचे सुचवले आहे.द्विष्ट: संशयित रुग्णांचे निदान, बाधित रुग्णांवर प्रभावी उपचार आणि त्यांचे योग्य पुनर्वसन करून जिल्ह्याला पूर्णपणे क्षयमुक्त करणे.

**बोगस डॉक्टरांविरुद्ध मोहीम तीव्र; तक्रारदाराचे नाव राहणार गोपनीय**

जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ५ बोगस वैद्यकीय व्यावसायिक आढळले आहेत. यावर चिंता व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांनी ही शोधमोहीम अधिक तीव्र करण्याचे आदेश दिले.जर नागरिकांना कोठेही बोगस डॉक्टर आढळल्यास त्यांनी तातडीने तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. तक्रार करणाऱ्या व्यक्तीचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले आहे.

**जन्म-मृत्यू नोंदींची होणार पडताळणी**

जन्म आणि मृत्यूच्या नोंदी केवळ कागदावर न राहता त्या वस्तुनिष्ठ असाव्यात, यासाठी जिल्हास्तरीय समन्वय समितीला मार्गदर्शन करताना जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक आणि तालुका आरोग्य अधिकारी यांनी या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करून त्याचा अहवाल जिल्हा समितीला सादर करावा.या मॅरेथॉन बैठकीत जिल्ह्यातील आरोग्य स्थितीचा सर्वांगीण आढावा घेण्यात आला.

यामध्ये प्रामुख्याने नियमित लसीकरण व गोवर-रुबेला मोहीम.१५ वा वित्त आयोग आणि महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' उपक्रम.राष्ट्रीय एड्स व तंबाखू नियंत्रण कार्यक्रम. वातावरणीय बदल आणि मानवी आरोग्यावर होणारे परिणाम. गुणवंत आरोग्य कर्मचाऱ्यांचा गौरव आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# सरकारी शाळांचा 'गेम' आणि नेत्यांची 'दुकानदारी'

## गरिबांच्या शिक्षणाचा गळा आवळला जातोय!

एकीकडे 'पढेगा इंडिया तभी तो बढेगा इंडिया'च्या वल्गना केल्या जातात, तर दुसरीकडे ग्रामीण भागाचा कणा असलेल्या सरकारी शाळा जाणीवपूर्वक मृत्यूच्या दारात ढकलल्या जात आहेत. आज गल्लीबोळांत **'कॉन्व्हेंट'** शाळांचे पेव फुटले आहे. या शाळा म्हणजे केवळ शिक्षणाची केंद्रे नसून, सत्ताधारी नेत्यांची 'पांढरपेशी वसुली केंद्रे' बनली आहेत, असा खळबळजनक वास्तव समोर येत आहे.

नेत्यांचा 'धंदा' आणि सरकारचा 'फायदा'

सरकारी शाळा बंद पाडण्यामागे एक मोठे अर्थकारण दडलेले आहे. सरकारी शाळा चालवायची तर शिक्षकांचे पगार, पेन्शन, इमारतीची देखभाल आणि प्रशासकीय जबाबदारी सरकारला घ्यावी लागते. पण जर मुले कॉन्व्हेंटमध्ये गेली, तर सरकार या सर्व जबाबदारीतून मुक्त होते. धक्कादायक बाब म्हणजे, बहुतांश मोठ्या कॉन्व्हेंट शाळांचे मालक हे विद्यमान किंवा माजी लोकप्रतिनिधीच आहेत.

**अनुदानाचा खेळ संपला:** पूर्वी खासगी शाळांना अनुदान मिळायचे, त्यात मर्यादा होत्या. पण आता 'स्वयंअर्थसहाय्यित' (Self-Financed) शाळांच्या नावाखाली पालकांकडून हवा तसा विकास शुल्क (Development Fee) उकळला जात आहे. ज्याचे कोणतेही ऑडिट होत नाही.

**शिक्षकांचे शोषण:** सरकारी शिक्षकांना चांगला पगार मिळतो, म्हणून सरकारला ते खुपतात. याउलट कॉन्व्हेंटमध्ये तुटपुंज्या पगारावर शिक्षकांना राबवून घेतले जाते आणि पालकांकडून मात्र लाखांच्या घरात फी घेतली जाते. हा निव्वळ 'शिक्षणाचा बाजार' आहे.

गुणवत्तेचा मुखवटा आणि पालकांचा भ्रम

कॉन्व्हेंट म्हणजे गुणवत्ता, हा एक मोठा भ्रम समाजात पसरवला गेला आहे. वास्तव हे आहे की,सरकारी शाळांमधील शिक्षक हे कडक पात्रता परीक्षा (TET/TAIT) देऊन आलेले राज्यातील सर्वोत्तम बुद्धिमंत असतात.

कॉन्व्हेंटमध्ये केवळ **'चमकधमक'** आणि **'इंग्रजी बोलण्यावर'** भर दिला जातो, मात्र पायाभूत ज्ञान (Basic Concepts) सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांचेच भक्कम असते.

पालकांची दुहेरी ओढाताण: श्रीमंत पालक ट्यूशन लावून मुलांची गुणवत्ता टिकवतात, पण गरीब पालक मात्र सरकारी शाळा बंद झाल्यामुळे **'ना घरचा ना घाटचा'** झाला आहे.

ग्रामीण भागावर**'अंधारयुगा'**चे संकट!

आज ज्यांच्याकडे पैसा आहे, ते कॉन्व्हेंटची फी भरतील. पण ज्या शेतमजुराच्या पोराला जिल्हा परिषदेच्या शाळेत मोफत शिक्षण मिळते, त्याचं काय? जर आज सरकारी शाळा वाचवल्या नाहीत, तर उद्या शिक्षण ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी बनेल.इतिहासाची साक्ष आहे, श्रीमंती कोणाकडेच कायम टिकत नाही. अंबानींच्या एका मुलाची परिस्थिती आज काय आहे, हे आपण पाहतोय. उद्या जर आपली पुढची पिढी गरिबीत आली आणि सरकारी शाळाच शिल्लक राहिल्या नाहीत, तर आपली मुले अडाणी राहतील का? हा प्रश्न प्रत्येक पालकाने स्वतःला विचारला पाहिजे.

**आता वेळ आली आहे 'बॉयकॉट' करण्याची!**

सरकारी शाळा वाचवणे म्हणजे केवळ इमारत वाचवणे नाही, तर सामान्य माणसाच्या प्रगतीचा मार्ग वाचवणे आहे. जर सरकारी शाळांमधील पटसंख्या घटली, तर सरकार त्या बंद करण्याचे निमित्त शोधते.

नेत्यांनी स्वतःच्या शाळांची दुकानदारी बंद करावी.

शासनाने **'कॉन्व्हेंट'** धार्जिणे धोरण सोडून सरकारी शाळांना **'डिजिटल'** आणि 'इंग्रजी माध्यमा'च्या तोडीस तोड सुविधा द्याव्यात.

पालकांनी केवळ प्रतिष्ठेसाठी कॉन्व्हेंटच्या मागे न लागता सरकारी शाळांचे सक्षमीकरण करावे.

जर आज आपण सरकारी शाळांसाठी रस्त्यावर उतरलो नाही, तर उद्याच्या गरिबांच्या पिढीला शिक्षणापासून वंचित ठेवल्याचे पाप आपल्याच माथी असेल. **'सरकारी शाळा वाचवा, गरिबांचे भविष्य वाचवा!**

# थरार पूर्णा रेल्वे स्थानकावर! मृत्यूच्या दाढेतून ७५ वर्षीय वृद्धाला खेचले बाहेर

**आत्ताच एक्सप्रेस**

**पूर्णा (प्रतिनिधी)** धावती ट्रेन, सुटलेला तोल आणि समोर उभा ठाकलेला काळ... पण नियतीला काहीतरी वेगळंच मंजूर होतं. पूर्णा रेल्वे स्थानकावर मंगळवारी संध्याकाळी मृत्यू आणि जीवनामध्ये केवळ काही सेकंदांचे अंतर उरले असताना, एका रणरागिणीने आपल्या प्राणांची बाजी लावून एका वृद्धाचा जीव वाचवला. रेल्वे सुरक्षा दलाच्या (ठझऋ) महिला कॉन्स्टेबल सौ. रमा शर्मा यांच्या या चित्तथारक धाडसामुळे ७५ वर्षीय बाबुराव घाटगे यांना मृत्यूच्या दारातून सुखरूप परत आणण्यात यश आले आहे.

**आरपीएफ महिला कॉन्स्टेबलचे 'रुद्र रूप' आणि साहसाला सलाम!**

दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी, सायंकाळी ७:४५ वाजता पूर्णा स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर पनवेल एक्सप्रेस (गाडी क्र. १७६१४) आली होती. गाडी सुटण्याची वेळ झाली आणि वेगाने धावू लागली. याच दरम्यान ७५ वर्षीय वृद्ध प्रवासी श्री. बाबुराव घाटगे यांनी धावत्या गाडीत चढण्याचा जीवावर बेतणारा प्रयत्न केला. मात्र, वयोमानामुळे त्यांचा तोल गेला आणि ते थेट प्लॅटफॉर्म आणि धावत्या गाडीच्या मधल्या जीवघेण्या पोकळीत (Gap) खेचले जाऊ लागले.

**देवदूत बनून धावली 'ती' खाकी!**

क्षणार्धात बाबुराव गाडीखाली जाणार, इतक्यात तिथे कर्तव्यावर असलेल्या आरपीएफ कॉन्स्टेबल रमा शर्मा यांची नजर त्यांच्यावर पडली. एक सेकंदाचाही विलंब न लावता, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रमा शर्मा वाघासारख्या झेपावल्या. गाडीचा वेग वाढत होता, पण रमा शर्मा यांनी अत्यंत चपळाईने बाबुरावांना घट्ट पकडून बाहेरच्या दिशेला ओढले. अवघ्या काही सेकंदांचा उशीर झाला असता, तर मोठा अनर्थ घडला असता. मात्र, रमा शर्मा यांच्या सतर्कतेने बाबुरावांना पुनर्जन्म मिळाला.

**'ऑपरेशन जीवन रक्षा' आणि 'मेरी सहेली'चा खरा अर्थ!**

सौ. रमा शर्मा या 'मेरी सहेली' पथकांतर्गत महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी तैनात होत्या. आरपीएफच्या ऑपरेशन जीवन रक्षा मोहिमेअंतर्गत त्यांनी दाखवलेली ही तत्परता रेल्वे प्रशासनासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या या शौर्याचे कौतुक केवळ रेल्वे विभागातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे.

रेल्वे सुरक्षा दल केवळ मालमत्तेचे रक्षण करत नाही, तर प्रत्येक प्रवाशाच्या श्वासाचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे, हे आज पुन्हा एकदा सिद्ध झाले.

**– रेल्वे प्रवासी संघटना.**




प्रवाशांना अखेरचा इशारा!

या घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने पुन्हा एकदा प्रवाशांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. धावत्या गाडीत चढणे किंवा उतरणे हा स्टंट नाही, तर आत्महत्येचा प्रयत्न ठरू शकतो. तुमचा एक चुकीचा निर्णय तुमच्या कुटुंबाला आयुष्यभराचे दुःख देऊ शकतो. नेहमी प्लॅटफॉर्मवर वेळेत पोहोचा आणि रेल्वे नियमांचे पालन करा.बाबुराव घाटगे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी डोळ्यांत आनंदाश्रू आणून आरपीएफ आणि विशेषतः रमा शर्मा यांचे आभार मानले आहेत. खाकी वर्दीतील या माणुसकीच्या दर्शनाने आज संपूर्ण पूर्णा स्थानक गहिवरून गेले होते.

# मराठी भाषा दिन : अभिव्यक्तीचा उत्सव

आपली भाषा ही अभिजात मराठी म्हणून मान्य झाली आहे. अमृतातेही पैजा जिंकणारी आपली ही मातृभाषा आणि ही भाषा बोलण्याचा सार्थ अभिमान आपण बाळगत आहोत कोणत्याही भाषेत असणारे शब्द स्वीकारण्याची आणि त्यानुरूप उत्क्रांत होण्याची क्षमता असल्यामुळे आपली मराठी समृद्ध आणि संपन्न होत आहे, याचाही सार्थ अभिमान आपणास हवा.

दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रात मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. ज्येष्ठ कवी वसंत बापट यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची, इतिहासाची आणि अस्मितेची वाहक असते. २७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा जन्मदिन. त्यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.

**मराठी भाषेचा समृद्ध वारसा**

मराठी ही इंडो-आर्यन भाषासमूहातील एक प्रमुख भाषा असून तिचा इतिहास सुमारे एक हजार वर्षांहून अधिक जुना आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या अभंग-ओव्यांनी मराठीला अध्यात्मिक उंची दिली. पुढे शाहिरी परंपरा, पोवाडे, भारुडे, कीर्तन या माध्यमांतून मराठी जनमानसात रुजली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठी प्रशासनाची भाषा बनली. राजकारभारात, किल्ल्यांवरील पत्रव्यवहारात आणि शासननिर्णयांत मराठीचा प्रभावी वापर होत असे. त्यामुळे मराठीला स्वाभिमानाचे आणि स्वराज्याचे प्रतीक मानले जाते.




**साहित्य, पत्रकारिता आणि आधुनिक मराठी**

लोकमान्य टिळकांनी 'केसरी'सारख्या वृत्तपत्रातून मराठी पत्रकारितेला बळ दिले. पुढे प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज अशा अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्य समृद्ध केले. कादंबरी, कथा, कविता, नाटक, चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ आणि आता डिजिटल माध्यमांमुळे मराठीची अभिव्यक्ती अधिक व्यापक झाली आहे.

आज मराठी भाषा विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, शिक्षण आणि सामाजिक माध्यमांमध्येही प्रभावीपणे वापरली जात आहे. मराठी विकिपीडिया, ब्लॉग्स, यूट्यूब, पॉडकास्ट या माध्यमांतून नव्या पिढीला मराठीची ओढ निर्माण होत आहे.

**भाषा जपणे - काळाची गरज**

जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असला तरी मातृभाषेचे महत्त्व कमी होत नाही. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विचारांची मांडणी स्पष्ट होते, सर्जनशीलता वाढते आणि संस्कार दृढ होतात.मराठी भाषा दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, दैनंदिन जीवनात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याची शपथ घेण्याचा दिवस असावा. घरात, कार्यालयात, शाळेत आणि सार्वजनिक व्यवहारात मराठीचा सन्मानपूर्वक वापर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

मराठी ही केवळ भाषा नाही, तर ती आपली ओळख आहे, संस्कृती आहे, आत्म्याचा आवाज आहे. जय जय महाराष्ट्र माझा म्हणताना ज्या अभिमानाची भावना जागते, तीच भावना मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ व्हावी.चला, मराठी भाषा दिनी आपण सर्वांनी मराठीचा गौरव करूया, तिचे संवर्धन करूया आणि पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य ठेवा जपूया.

मराठी माझी मायबोली
मराठी माझा बाणा
मराठी माझा अभिमान!

**-प्रशांत दैठणकर**
**प्रभारी उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**

# शिक्षण नि:शुल्क ; करायला हवं?

शिक्षण निःशुल्क करायला हवं. त्याचं कारण आहे विकासाची बुद्धीमत्ता. विकासाची बुद्धीमत्ता ही श्रीमंतांच्याच घरी नसते तर ती गरिबांच्याही घरी असते. मात्र श्रीमंतांची मुलं ही शिक्षणात पुढे जातांना दिसतात तर गरिबांची मुलं ही मागे पडतात. याला कारण आहे पैसा. पैशाच्या बळावर श्रीमंत मंडळी आपल्या मुलांना कॉन्व्हेंटमध्ये टाकतात. त्याची घरीही शिकवणी घेतात. वरुन त्याला महागडी शिकवणी वर्गही लावून देतात. अशी परिस्थिती गरिबांच्या घरी नसते. म्हणूनच गरिबांच्या घरची मुलं शिक्षणात मागे पडतात. त्यासाठी शिक्षण निःशुल्क करायला हवं. जेणेकरुन गरिबांचीही मुलं शिक्षणात पुढं जावून आपल्या बुद्धीमतातेनं देशाचा विकास साधू शकतील.

शिक्षण...... म्हणतात की शिक्षण वाघिणीचं दूध आहे. जो शिकतो, तो गुरगुरतो आणि जे शिकत नाहीत ते गुरगुरत नाहीत, असं मानलं जातं व म्हटलंही जातं. परंतु वास्तविक आजची परिस्थिती पाहता, जो शिकतो, तो गुरगुरतांना दिसत नाहीत तर तो घाबरणारा दिसतो आणि जो शिकत नाही. तो गुरगुरतांना दिसतो. याचं कारण काय असावं?

या कारणांचा शोध घेतला असता, जो शिकतो, त्याला संविधानातील कलमा माहीत होतात. माहीत असतात की आपण अमुक अमुक गोष्ट केली की त्याची शिक्षा काय होवू शकते. ते गुन्ह्याला घाबरतात आणि तेवढंच कलमांनाही. म्हणतात की शहाण्या माणसानं कायद्याच्या वाटेला जावू नये. याचं कारण तेच. म्हणूनच ते गुरगुरत नाही. परंतु जी मंडळी शिकलेली नसतात. त्यांना कायद्याची पाहिजे त्या प्रमाणात जाण नसते. तो व्यक्ती गुरगुरतो, कारण कायद्याची जाण नसल्यानं त्याच्या मनात अभय असतं. त्याला कायदे व कलमा तेवढ्या प्रमाणात कळत नाहीत. अशा व्यक्तींकडून जेव्हा गुन्हा घडतो. तेव्हा त्याला कळतं की कायदा हा कायदा आहे. तो काही आपल्ता हातचे बाहुले नाही.

अलिकडील काळात पालकवर्ग हा सुज्ञ झालेला आहे. तो परिस्थिती भोगतो. प्रसंगी उपाशी राहतो. परंतु आपल्या पाल्याला शिकवतो. खरं तर संपुर्ण शिक्षणाची प्रक्रिया ही निःशुल्क असायला हवी होती. परंतु ती निःशुल्क नाही. ते शिक्षण घेतांना प्रसंगी खाजगी शाळेतूनच घ्यावं लागतं. त्यातही भेदभाव आहे. खाजगी आणि सरकारी. जर एखाद्या विद्यार्थ्याला उच्च शिक्षण घ्यायचं असल्यास त्याला दोन प्रकारे प्रवेश मिळतो. पहिला प्रकार म्हणजे गुणवत्तेच्या आधारे प्रवेश व दुसरा मार्ग म्हणजे पैशाच्या आधारे प्रवेश. मग त्या विद्यार्थ्यांना कितीही कमी गुण मिळाले तरी तो विद्यार्थी तरुण जातो पैशाच्या आधारावर. त्याची अवस्था पैसा फेक व तमाशा देख अशी होते. जेवढा जास्त पैसा फेकेल, तेवढं चांगलं महाविद्यालय. परंतु ही पैशाची बाब सरकारी महाविद्यालयात चालत नाही. सरकारी महाविद्यालयात गुणवत्ताच लागू होते व ते महाविद्यालयात पाहिजे त्या प्रमाणात देशात नाहीत. याचाच अर्थ असा की खजगी जी महाविद्यालये आहेत. त्या महाविद्यालयाला पैसा कमविण्याचा अधिकार आहे व असा पैसा कमविण्याला काही सीमाच नाही.

आज देशात अशी बरीच महाविद्यालये आहेत की जी सरकारी स्वरुपाची नाहीत तर खाजगी स्वरुपाची आहेत. अशा महाविद्यालयाचा मूळ उद्देशच पैसा कमविणे हा आहे. मग असा पैसा विद्यार्थ्यांजवळ आहे की नाही हे पाहिलं जात नाही. तशीच ही महाविद्यालये कोणाची असतात. ही महाविद्यालये कोणाची आहेत, याचा शोध घेतांना आवर्जून आढळून येतं की ही महाविद्यालये जास्त न शिकलेल्या अर्थात दोन चार वर्ग शिकलेल्या माणसांची असतात. जे उद्योगपती असतात वा एखाद्या राजकीय पार्टीचे नेते असतात. याचाच अर्थ असा की शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारी झालेली आहे.

शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारीच. ज्यांच्याकडे पैसा, त्याचं शिक्षण. मग गुणवत्ता असूनही गरीब घरातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत नाहीत. ते शिक्षणात मागे पडतात, पैशाच्या आधारावरुन. गुणवत्तेच्या आधारावरुन नाही. अलिकडील काळात शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या बालपणापासूनच पैसा लागतो. अगदी त्या विद्यार्थ्याला आपली शौच धुवायची अक्कल नसते, त्या काळापासून तो शाळेत जातो व शिक्षण घेत असतो. त्यातच शाळा, ट्युशन यात गुरफटून त्यांची गुणवत्ता वाढत असते आणि ही गुणवत्ता वाढत असतांना पैसा लागतो. पैशाच्या भरवशावर तो मुलगा चांगलं इंग्रजीतून शिक्षण घेत असतो. त्यासाठी पालकही सढळ हातानं खर्च करीत असतात. ज्यांच्याकडे पैसा आहे ते. परंतु ज्यांच्याकडे पैसे नाहीत, ती मंडळी सरकारी शाळेत जात असतात. जिथं इंग्रजी माध्यम नसतं आणि असेलही तरी तिथं व्यवस्थित शिकवलं जात नाही. कारण पालक गरीब असतात. पालक अडाणीही असतात. कारण ते पालक त्या ठिकाणी त्यांची मुले शिकत असतांना ती मुलं खरंच शिकतात का? शिक्षक शिकवितात का? विद्यार्थी कितपत शिकला? हेही पडताळून पाहात नाहीत. शिवाय शिक्षकांना त्याचा जॉबही विचारत नाहीत की ही मुलं का शिकली नाही? सरकारी शाळेतील ही मुलं कशीबशी शिकतात, ज्यांना इंग्रजी अजिबात येत नाही. गणिती क्रिया बरोबर येत नाही. पालक कधी घरी त्याला घेवून बसत नाही. त्याच्या अभ्यासाची ट्युशनमध्ये पुनरावृत्ती होत नाही. तो उच्च शिक्षणही घेवू शकत नाही. कारण उच्च शिक्षणाचं माध्यम हे स्थानिक भाषेतून नसतं. ते विदेशी भाषेतून म्हणजेच इंग्रजी भाषेतून असतं आणि त्याचेजवळ पैसेही नसतात.

मग तो उच्च शिक्षण कसा घेवू शकेल. कधी कर्ज काढून त्या विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेण्याचा प्रयत्न जरी केला तरी ते शिक्षणाच्या स्पर्धेतून बाहेर पडतात. कारण असतं, स्थानिक आतापर्यंत शिकलेली भाषा. ती भाषा मातृभाषा असते. विदेशी भाषा नसते.

अलिकडील काळात शिक्षण हे गरीबांसाठी राहिलेलं व उरलेलं दिसत नाही. ते श्रीमंतांचं झालेलं दिसत आहे. अगदी दोन तीन वर्षाची असलेली मुलं जेव्हा शाळेत शिकायला जातात. तेव्हा त्याच्या पालकांना लाखोच्या घरात वर्षाकाठी पैसा द्यावा लागतो आणि स्थानिक भाषेच्या शाळेत शिकवायचे झाल्यास त्या शाळेत मुलं नसतात. शिकविणारे शिक्षक नसतात आणि शिक्षक असलेही तरी ते शिकवीत नाहीत. कारण अल्प असलेली दोनचार मुलं शिकवायला आवडत नाही. मन लागत नाही शिकवायला. अशावेळेस त्रेधातिरपीट उडते. काही शाळा पटसंख्येअभावी बंद होतांना दिसत आहेत.

शिक्षण वाघिणीचं दूध आहे. जो शिकेल तो गुरगुरेल. परंतु शिक्षणाची ही अवस्था पाहिली तर जे शिकले, उच्च शिक्षण ज्यांनी घेतलं. त्यांनी आपला फायदा पाहिलेला दिसतो. ते गुरगुरत नाहीत, शिक्षणाच्या असल्या अवस्थेवर. जे शिक्षण आज गरीबांसाठी उरलेले नाही. कारण त्यांनी जे उच्च शिक्षण घेतलेलं आहे. त्यातून ते फक्त पैसा कमविण्याचा उद्देश ठेवतात. ज्यातून ते आपली मुलं पैसे लावून शिकविण्याकडे जास्त कल ठेवतात. अन् ते गुरगुरतील तरी कोणाच्या विरोधात? ज्यांनी त्यांना नोकरी दिली? त्यांच्या पोटाला अन्न दिलं?

ज्यांनी त्यांना अन्न दिलेलं आहे, त्यांची शिक्षणाची योग्यता तपासली असता ते दोनचारच वर्ग शिकलेले दिसतात. त्यातच तेच गुरगुरतात अशा उच्च शिक्षण घेतलेल्या माणसांवर. त्यांना आपल्याकडे नोकरी देवून. एखादा अडाणी कंपनीचा मालक मॅनेजर म्हणून ज्या व्यक्तीची नियुक्ती करतो. तो उच्च शिक्षण शिकलेला असतो. परंतु तो जरी उच्च शिक्षण शिकलेला असेल तरी तो मॅनेजर दोन कौडीच्या न शिकलेल्या मालकांपुढं नतमस्तक होतो. एवढंच नाही तर आज ज्या ठिकाणी उच्च शिक्षण मिळविण्यासाठी प्रयत्नांचा आटापीटा केला जातो. त्या ठिकाणची महाविद्यालये चालविणारा मालक हाही दोनच वर्ग शिकलेला दिसतो. त्या दोनवर्ग शिकलेल्या माणसांपुढं उच्च शिक्षण शिकणारी मंडळी हा लाचार बसून रांगेत उभी राहतात. कारण आजच्या शिक्षणानं समाजाची अवस्था ही लाचार बनवली आहे. हे का घडत आहे? याला जबाबदार कोण? तर त्याचं सहज उत्तर मिळतं, सरकार. खरंच अशी समाजाची लाचार अवस्था बनवायला संपुर्णपणे जबाबदार पैसा जरी दिसत असला तरी सरकारनंही समाजाला लाचार बनवलं आहे. त्यांनी शिक्षणाच्या गर्तेत समाजाची मानसिकता ही खाजगी स्वरुपाची केलेली आहे. सरकार कोणतंही शिक्षण निःशुल्क करु शकतो. परंतु ते करत नाही. कारण सरकारमध्ये जे चालविणारे घटक आहेत. त्यांच्याच शाळा आहेत, त्याही खाजगी. त्यांचा उद्देश केवळ पैसा कमविणे आहे व असा पैसा हा त्यांना अशाच खाजगी स्वरुपाच्या गोष्टीतून मिळतो. त्यातच सरकारमध्ये अशीही मंडळी आहेत की जी मंडळी दोनच वर्ग शिकलेली आहेत. ज्यांचं कोणीच ऐकून घेत नाहीत.

विशेष सांगायचं झाल्यास शिक्षण हे निःशुल्क व्हायलाच हवे आणि ते सरकारच करु शकते आणि सरकारनं ते करायलाच हवं. तेव्हाच गरीबांची मुलंही पुढं जावू शकतील. कारण गरीबांच्याच मुलांत जास्त कौशल्य असतं. श्रीमंतांच्या घरात तेवढं कौशल्य नसतं. ते पैशाच्या भरवशावर नक्कीच शिकतात. परंतु जेव्हा शिक्षणाचा उपयोग करण्याची वेळ येते ना.

तेव्हा ते गरीबांच्या उच्चशिक्षित मुलांकडेच पाहात असतात. हे तेवढंच खरं. शिवाय देशाचा विकास करायचा असेल तर गरीब मुलांचीच गुणवत्ता कामात येते. श्रीमंतांची नाही. म्हणूनच गरिबांच्या शिक्षणासाठी शिक्षण हे निःशुल्क व्हायलाच हवं नव्हे तर करायलाच हवं. यात शंका नाही.

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

# महावितरणचा 'शॉक'

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलात २२ हजार थकबाकीदारांची वीज कापली!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** वीजबिलाची थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांविरुद्ध महावितरणने आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई सुरू केली आहे. परिमंडलातील एकूण ४ लाख ६ हजार ८२१ ग्राहकांकडे २५० कोटी १० लाख रुपयांची थकबाकी असून, ती वसूल करण्यासाठी फेब्रुवारी महिन्यात तब्बल २२ हजार ३६१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.कुठे किती थकबाकी? (आकडेवारी लाखांत)वसुली मोहिमेचा जोर तिन्ही मंडळांत सारखाच असून आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

मंडळग्राहक संख्याथकबाकी (कोटी रु.)वीज खंडित केलेले ग्राहकशहर मंडळ १,०६,२८८५२.७४४,८६१ ग्रामीण मंडळ १,७४,३२१५७.४८८,८१३ जालना मंडळ १,२६,२१२१३९.८८७,६८७ एकूण ४,०६, ८२१२५०.१०२१,३६१ सुट्टीच्या दिवशीही कारवाईचा बडगामुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या मार्गदर्शनाखाली अभियंता आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचे पथक सुट्टीच्या दिवशीही मैदानात उतरले आहे.

जे ग्राहक बिल भरण्यास टाळाटाळ करत आहेत, त्यांचा पुरवठा तात्काळ खंडित केला जात आहे. विशेष म्हणजे, पुरवठा खंडित केल्यानंतर अनधिकृतपणे वीज वापरणाऱ्यांवर फौजदारी कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.महत्त्वाच्या सूचना आणि सुविधाऑनलाइन पेमेंटवर सूट: रांगेत उभे राहण्याऐवजी महावितरणचे प, वेबसाइट, त्रेम्रश्रश झरू किंवा झहेपशझश द्वारे बिल भरल्यास १.२५% सूट मिळत आहे.शेजाऱ्यांना वीज देणे पडेल महागात: थकबाकीदार शेजाऱ्याला वीज दिल्यास, वीज देणाऱ्याचाही पुरवठा खंडित करून त्यांच्यावर वीजचोरीचा गुन्हा दाखल केला जाईल. पुनर्जोडणीचा भुर्दंड: एकदा वीज कापली की, ती पुन्हा जोडण्यासाठी सिंगल फेजला ३१० रुपये आणि थ्री फेजला ५२० रुपये अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. तक्रारींसाठी २ मार्चला 'वीजबिल दुरुस्ती मेळावा'ज्या ग्राहकांच्या बिलात काही त्रुटी किंवा तक्रारी आहेत, त्यांच्यासाठी २ मार्च रोजी सर्व उपविभाग कार्यालयांमध्ये मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात बिलांची दुरुस्ती करून तात्काळ भरणा करण्याची सोय उपलब्ध असेल.महावितरणला वीजपुरवठा खंडित करण्याची हौस नाही, परंतु वसुलीशिवाय पर्याय उरलेला नाही. ग्राहकांनी कटू कारवाई टाळण्यासाठी स्वतःहून थकबाकी भरावी.- पवनकुमार कछोट, मुख्य अभियंता, महावितरण.

दैंनिक आत्माच एक्सप्रेस
**Old Name**
Dhiraj Pradeeprao Deshmukh
**New Name**
Dhiraj Pradiprao Deshmukh
**Adress -** Sukali Post. Gaikwad Tal: Shevgaon Dist.-Ahilyanagar Pin: 414504
Mob : 9673536174

# जवखेडा बु. ते गौरपिप्री दोन किलोमीटर रस्त्याचे काम रखडले

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील जवखेडा बु. येथून गौरपिप्रीकडे जाणाऱ्या सुमारे दोन किलोमीटर अंतराच्या मुख्य रस्त्याचे काम अचानकपणे बंद करण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. संबंधित ठेकेदाराने हे काम तातडीने पुन्हा सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे, अशी आग्रही मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे.

## पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याची नागरिकांची तीव्र मागणी

**दळणवळणाचा मुख्य मार्ग असूनही दुर्लक्ष**

सदर रस्ता हा परिसरातील दळणवळणाचा प्रमुख मार्ग आहे. शेतकरी, शालेय विद्यार्थी, रुग्ण आणि व्यापारी यांच्यासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

मात्र, सध्या रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत टाकून देण्यात आले आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, उखडलेल्या खडीमुळे वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला असून पादचाऱ्यांनाही चालणे कठीण झाले आहे.

**पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्यास चिखलाचे साम्राज्य**

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर या रस्त्याच्या कामाला मुहूर्त लागला होता. काम सुरू झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते, मात्र अचानक काम थांबवण्यात आल्याने ग्रामस्थ चक्रावून गेले आहेत. पावसाळा अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. जर पावसाळ्यापूर्वी डांबरीकरण किंवा खडीकरण पूर्ण झाले नाही, तर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर चिखल होईल आणि वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**कामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह**

रस्त्याचे काम थातूर-मातूर पद्धतीने सुरू असल्याचा गंभीर आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असून केवळ औपचारिकता पूर्ण केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाने या कामाची गुणवत्ता तपासावी, अशीही मागणी होत आहे.



**आंदोलनाचा इशारा**

रस्ता हा गावाच्या विकासाचा कणा असतो. तोच जर अर्धवट राहिला, तर सर्वसामान्यांचे अतोनात हाल होतात. संबंधित ठेकेदार आणि प्रशासकीय विभागाने याची तातडीने दखल घेऊन काम युद्धपातळीवर सुरू करावे, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा जवखेडा बु. येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

आता या मागणीची दखल घेऊन प्रशासन संबंधित ठेकेदाराला काम सुरू करण्याचे आदेश देते का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावरील हल्ल्याचा निषेध; लासूर स्टेशन काँग्रेसतर्फे पोलिसांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** काँग्रेस पक्षाचे धडाडीचे प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर पुणे येथे झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ लासूर स्टेशन शहर काँग्रेसच्या वतीने शिल्लेगाव पोलिसांना निवेदन देण्यात आले. या हल्ल्यामागील मुख्य सूत्रधार तुषार दामगुडे आणि त्याच्या सहकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



**घटनेचा पार्श्वभूमी आणि संताप**

हनुमंत पवार हे इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये आपल्या बिनतोड युक्तिवादाने आणि अभ्यासू भूमिकेने काँग्रेसची बाजू खंबीरपणे मांडत असतात. विशेषतः सत्ताधारी भाजपच्या धोरणांची पोलखोल करण्यात त्यांचा मोठा वाटा असतो. याच वैचारिक रागातून पुण्यात तुषार दामगुडे याने आपल्या साथीदारांसह कट रचून पवार यांच्यावर हल्ला केला. हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नसून, तो अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संवैधानिक मूल्यांवर झालेला हल्ला असल्याची भावना काँग्रेस कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

लासूर स्टेशन पोलीस चौकी येथे पीएसआय काळे यांनी काँग्रेसचे निवेदन स्वीकारले. या निवेदनात प्रामुख्याने खालील मुद्दे मांडण्यात आले.हनुमंत पवार हे शेतकरी-कष्टकऱ्यांचे नेतृत्व करणारे नेते असून त्यांचा आवाज दाबण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे.

लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य असताना अशा प्रकारची हिंसक कृत्ये निषेधार्ह आहेत.हल्लेखोर तुषार दामगुडे व त्याच्या साथीदारांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई व्हावी.

यावेळी काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष किशोर पवार सर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने मोहनराव खंडागळे,भास्कर बनसोडे ,ज्ञानेश्वर वाघचौरे,रिचर्ड बत्तीशे,सिद्धार्थ गायकवाड,नागेश बागुल,नसीर टेलर,रियाज भाई यांसह अनेक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी उपस्थित राहून घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. कोणाचाही आवाज अशा प्रकारे दाबला जाऊ शकत नाही आणि आम्ही आमच्या नेत्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा इशारा यावेळी शहर काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

# 'ग्रामीण कन्या सुरक्षा' गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंध मोहिमेचा जिल्हास्तरीय प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** 'ग्रामीण कन्या सुरक्षा' या गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंध मोहिमेचा आज जिल्हा परिषद शाळा, सातारा येथे अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.



जिविका फाउंडेशन यांच्या वतीने जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग व शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने ही मोहीम राबविण्यात येत असून क्रेडिटक्सेस इंडिया फाउंडेशन यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या सहकार्याने अंमलात आणला जात आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमधील एक प्रमुख पण टाळता येण्यासारखा कर्करोग आहे. योग्य वेळी जनजागृती व किशोरवयात क्ष्मत लसीकरण केल्यास भविष्यात या आजाराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. या मोहिमेंतर्गत ५,००० क्ष्मत लसींचे डोस उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषद शाळा सातारा येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागेश सावरगावकर, क्रेडीट क्सेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतिष राव, जिविका फाऊंडेशनचे कृणाल मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे म्हणाले की, गर्भाशय मुख कर्करोगमुक्त जिल्हा हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'ग्रामीण कन्या सुरक्षा' सारखे प्रतिबंधात्मक आरोग्य उपक्रम अत्यंत आवश्यक आहेत.

योग्य वयात लसीकरण व योग्य माहिती दिल्यास हा आजार टाळता येऊ शकतो. अशा उपक्रमांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे.

गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंधासाठी जिल्हास्तरीय मोहीम,लक्षित गट: शालेय वयोगटातील मुली,वैद्यकीय देखरेखीखाली HPV लसीकरण, CSR अंतर्गत ५,००० क्ष्मत लसींचा पाठिंबा जिल्हा प्रशासन, आरोग्य व शिक्षण विभाग यांचा सक्रिय सहभाग.

# थरार! पैठण एमआयडीसी पोलिसांची 'सिंघम' स्टाईल कारवाई; खुनाचा थरार २४ तासांत उघड

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी / हारून शेख/** पैठण तालुक्यातील बालानगर परिसरात घडलेल्या एका थरारक खुनाचा छडा लावण्यात पैठण एमआयडीसी पोलिसांना अवघ्या २४ तासांत यश आले आहे. दारूच्या नशेत झालेल्या वादातून दगडाने कपाळावर वार करून अहेमद जाफर पठाण यांची हत्या करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने बेड्या ठोकल्या आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही धडाकेबाज कामगिरी केली.

## आरोपीच्या मुसक्या आवळल्या

दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास बालानगर-ढोरकीन रोडवरील युसूफ जाफर पठाण यांच्या शेतात एक तरुण रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. कपाळावर खोलवर जखम आणि रक्ताचा सडा पडलेल्या अवस्थेत अहेमद जाफर पठाण (रा. बालानगर) हे आढळून आले. घटनेचे गांभीर्य ओळखून एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि ईश्वर जगदाळे यांनी तातडीने फौजफाट्यासह घटनास्थळ गाठले.

**पोलिसांसमोर होते मोठे आव्हान**

घटनास्थळ गावापासून निर्जन स्थळी असल्याने आणि प्रत्यक्षदर्शी कोणीही नसल्याने हा तपास करणे पोलिसांसाठी मोठे आव्हान होते. मात्र, सपोनि जगदाळे यांनी हार न मानता तात्काळ दोन विशेष पथके तयार केली आणि तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

**असा लागला छडा: गुप्तेराच्या माहितीने आरोपी जाळ्यात**

तपासादरम्यान गुप्त बातमीदाराने माहिती दिली की, घटनेच्या वेळी अहेमद पठाण सोबत डोणगाव तांडा येथील केशवराव छगन चव्हाण हा इसम दिसला होता. या माहितीच्या आधारे पोलिसांनी बालानगर, डोणगाव तांडा, टेकडी तांडा, दरेगाव आणि मुकुंदवाडी परिसरात कोंबिंग ऑपरेशन राबवले. संशयित केशवराव चव्हाण याला ताब्यात घेऊन खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

**हत्येचे कारण: दारूची नशा आणि बोटाचा चावा**

आरोपीने दिलेल्या कबुलीनुसार,




आरोपी आणि मयत अहेमद पठाण हे बालानगर येथील देशी दारू दुकानाच्या पुढे इलेक्ट्रीक पोलजवळ दारू पित बसले होते. दारूच्या नशेत दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. यावेळी अहेमदने आरोपी केशवरावच्या उजव्या हाताच्या बोटाला जोरात चावा घेतला. वेदनेने व्याकुळ झालेल्या केशवरावने रागारागात जमिनीवरचा दगड उचलला आणि अहेमदच्या कपाळावर सपासप वार केले. अहेमद जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्यानंतर आरोपी तिथून पसार झाला होता.या टीमने फत्ते केली मोहीम

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने केली.सपोनि: ईश्वर जगदाळे,पोउपनि: कविता जगताप,पोलीस कर्मचारी: राहुल मोहतमल, करतारसिंग सिंगल, ज्ञानेश्वर भवर, मिलिंद घाटेश्वर, कृष्णा उगले, विष्णू कोलते, रामेश्वर पंडित,होमगार्ड: वाल्मीक घोंगडे, श्रीकांत त्रिभुवन, नंदू मंगरे, राहुल जाधव,गुन्हेगारांना कोणताही थारा दिला जाणार नाही. अवघ्या २४ तासांत आरोपीला जेरबंद करून पोलिसांनी आपली कर्तव्यदक्षता सिद्ध केली आहे.

## शेतकऱ्यांच्या कष्टाची लूट थांबावा!

# मका हमीभावासाठी खासदार डॉ. कल्याण काळे आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील मका उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या संकटात सापडला आहे. एकीकडे विक्रमी उत्पादन झाले असताना दुसरीकडे सरकारी खरेदी प्रक्रिया ठप्प असल्याने शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या लुटीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर, जालना-छत्रपती संभाजीनगरचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आक्रमक भूमिका मांडली.

आकडेवारीतून मांडले भीषण वास्तव

खासदार डॉ. काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील मका उत्पादनाची धक्कादायक आकडेवारी सादर केली:

एकूण मका पेरणी: सुमारे २,६३,००० हेक्टर,अपेक्षित उत्पादन: ७२,३२,५०० क्विंटल,शासकीय उद्दिष्ट (Target): जिल्ह्यासाठी केवळ १,००,००० क्विंटल लक्षांक मागवण्यात आला, त्यापैकी फक्त ३४,००० क्विंटललाच मंजुरी मिळाली.खरेदीची सद्यस्थिती: आतापर्यंत केवळ २१,७२९ क्विंटल मका खरेदी झाला



आहे. ९,६३४ नोंदणीकृत शेतकऱ्यांपैकी फक्त ७२९ शेतकऱ्यांचा माल घेतला गेला आहे.

**ही आर्थिक तफावत नाही, तर उघड लूट!**

डॉ. काळे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले की, शासनाचा हमीभाव २४०० रुपये प्रति क्विंटल असताना, खरेदी केंद्रे बंद असल्याने शेतकऱ्यांना नाईलाजास्तव खासगी व्यापाऱ्यांना १६०० ते १७०० रुपयांनी मका विकावा लागत आहे. प्रति क्विंटल ६०० ते ७०० रुपयांचा हा फटका शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणारा आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाची ही उघड लूट असून प्रशासन याकडे डोळेझाक करू शकत नाही, असा सज्जड दम त्यांनी यावेळी दिला.

प्रमुख मागण्या आणि आक्रमक पवित्रा

जिल्ह्यातील २४ खरेदी केंद्रांवर सध्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी खासदारांनी खालील मागण्या केल्या.मका खरेदी प्रक्रिया तातडीने आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय सुरू करावी.जिल्ह्यातील उत्पादनाचा विचार करता खरेदी लक्षांकात मोठी वाढ करावी.शेतकऱ्यांची गर्दी पाहता अतिरिक्त खरेदी केंद्रे तातडीने कार्यान्वित करावीत. खासगी व्यापाऱ्यांकडून होणारी लूट थांबवण्यासाठी प्रशासनाने कडक नियंत्रण ठेवावे.

यावेळी खासदार डॉ. काळे यांच्यासोबत जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, दत्तू काका ठोंबरे, राहुल सावंत, भाऊसाहेब जगताप, फुलंब्री तालुका अध्यक्ष संतोष मेटे, जगदीश डवले यांसह अनेक पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी वर्षभर राबतो, कर्ज काढतो आणि पिकाला भाव मिळायची वेळ येते तेव्हा शासन हात वर करते, हे सहन केले जाणार नाही. जोपर्यंत प्रत्येक शेतकऱ्याला हमीभाव मिळत नाही, तोपर्यंत मी शांत बसणार नाही.

**- खासदार डॉ. कल्याण काळे**

# शेतकरी एकजुटीचा हुंकार!

## 'आत्ताच एक्सप्रेस'च्या बातमीचा दणका; गंगापूर-लासूर स्टेशनला मका खरेदी पुन्हा सुरू

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** शेतकऱ्यांच्या घामाच्या दाण्याला योग्य भाव मिळावा यासाठी पुकारलेल्या लढ्याला अखेर मोठे यश आले आहे. गंगापूर आणि लासूर स्टेशन येथील बंद पडलेली शासकीय हमीभाव मका खरेदी केंद्रे पुन्हा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्रशासनाने घेतला आहे. हा विजय केवळ शेतकऱ्यांचा नसून, तो शेतकरी संघटना आणि 'आत्ताच एक्सप्रेस' ने दिलेल्या सातत्यपूर्ण लढ्याचा 'इफेक्ट' मानला जात आहे.






शासकीय हमीभावाने मका खरेदीची नोंदणी प्रक्रिया बंद झाल्याने आणि खरेदी केंद्र थंडावल्याने तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाला होता. आपला माल कवडीमोल भावाने व्यापाऱ्यांना विकायची वेळ शेतकऱ्यांवर आली होती. मात्र, नोंदणीला मुदतवाढ मिळावी आणि नोंदणीकृत शेतकऱ्यांचा प्रत्येक दाणा हमीभावाने खरेदी केला जावा, यासाठी 'आत्ताच एक्सप्रेस' ने रणशिंग फुंकले.

**'आत्ताच एक्सप्रेस'** आणि फिरोज मन्सुरी यांची आक्रमक पत्रकारिता

या संपूर्ण संघर्षात 'आत्ताच एक्सप्रेस'चे प्रतिनिधी फिरोज मन्सुरी यांनी पहिल्या दिवसापासून आक्रमक भूमिका घेतली. प्रशासकीय अनास्था आणि शेतकऱ्यांच्या वेदनांना आपल्या बातम्यांतून वाचा फोडली. नोंदणी मुदतवाढीपासून ते प्रत्यक्ष खरेदी सुरू होईपर्यंत मन्सुरी यांनी लावून धरलेल्या पाठपुराव्यामुळेच प्रशासनाला अखेर झुकून सकारात्मक निर्णय घ्यावा लागला.

**शेतकरी पुत्राचा मैदानावरील संघर्ष**

केवळ बातम्याच नाही, तर जमिनीवर उतरून शेतकऱ्यांचे संघटन करण्याचे काम शेतकरी पुत्र तथा ग्राम संवाद सरपंच संघटनेचे प्रदेश सचिव विशाल पाटील लांडगे यांनी केले. त्यांनी शेतकऱ्यांची ताकद एकवटून प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. माध्यम आणि शेतकरी नेत्यांच्या या अभेद्य युतीमुळेच हा विजय सुकर झाला.

**दुहेरी आनंद: अतिवृष्टीचे अनुदानही खात्यावर!**

मका खरेदी सुरू होण्यासोबतच शेतकऱ्यांसाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. २०२४ च्या अतिवृष्टी अनुदानासाठी जो लढा दिला होता, त्यालाही यश आले असून नुकसान भरपाईचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा झाले आहेत. एकाच वेळी दोन मोठ्या मागण्या मान्य झाल्याने गंगापूर तालुक्यातील बळीराजा सुखावला आहे.

हा विजय शेतकऱ्यांच्या एकजुटीचा आहे. 'आत्ताच एक्सप्रेस'ने आमचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवला, त्याबद्दल त्यांचे आभार. जोपर्यंत शेवटच्या शेतकऱ्याचा मका खरेदी केला जात नाही, तोपर्यंत आमचा पाठपुरावा सुरूच राहील.

**- शेतकरी बांधव**

(संतोष आघाडे, प्रदीप चव्हाण, गुलाब शहा, गणेश मांडवगड, कमलेश राजपूत)

मका खरेदी केंद्र सुरू झाले असले तरी, प्रक्रियेत पारदर्शकता आणि शेतकऱ्यांची अडवणूक होणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी, अन्यथा पुन्हा एकदा तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकरी वर्गातून देण्यात आला आहे.

# वडगाव कोल्हाटीत महावितरणचा दणका; १० जणांवर वीजचोरीचा गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/महावितरणने वीजचोरांविरुद्ध उघडलेल्या धडक मोहिमेत वाळूज परिसरातील वडगाव कोल्हाटी येथे १० जण जाळ्यात अडकले आहेत. लघुदाब विद्युत वाहिनीवर थेट आकडे टाकून अनधिकृतपणे वीज वापरल्याप्रकरणी या सर्वांवर छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नेमकी घटना काय?८ जानेवारी रोजी महावितरणच्या वाळूज महानगर शाखेचे पथक वडगाव कोल्हाटी परिसरात वीज जोडणी तपासणी आणि वीजचोरी रोखण्यासाठी गस्तीवर होते. या पथकात सहाय्यक अभियंता गोविंद दुसंगे, वरिष्ठ तंत्रज्ञ सुरेश पुरी आणि बाबासाहेब जाधव यांचा समावेश होता.तपासणी दरम्यान, गावातील काही नागरिक आपल्या राहत्या घरी मुख्य वीज वाहिनीवर आकडे टाकून किंवा मिनीपीलरमधून थेट वीज घेत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. कोणावर झाली कारवाई?महावितरणने दिलेल्या फिर्यादीनुसार, खालील व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्या चोरीच्या विजेचे मूल्य खालीलप्रमाणे आहे:नावचोरीच्या विजेची रक्कम नारायण गणेशराव आढाव १३,००२ पुंडलिक भाऊराव नवघरे १३,००२ गोविंद विश्वनाथ थोरात १३,००२ शुभम मनोज जैस्वाल १३,००२विजय प्रल्हाद नादवे१३,००२पुरुषोत्तम अण्णासाहेब कोकाटे१३,००२ गणेश शेषराव तायडे १३,५५० राजू संपत अवचरमल १३,५५० दिनेश नंदू दिवटे १२,४५२ अशोक त्रिंबक आव्हाड ११,४८२ गुन्हा दाखल होण्याचे कारणया १० जणांना महावितरणने चोरीच्या विजेचे निर्धारित बिल आणि प्रत्येकी २ हजार रुपयांचा दंड भरण्याची नोटीस दिली होती. मात्र, वारंवार सूचना देऊनही संबंधितांनी बिल आणि दंड भरण्यास टाळाटाळ केली. अखेर महावितरणच्या अधिकार्यांनी दिलेल्या तक्रारीवरून छावणी पोलिसांनी या सर्वांविरुद्ध विद्युत कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे.महावितरणचा इशारा: वीजचोरी हा गंभीर गुन्हा असून, अधिकृत वीज जोडणी घेऊनच विजेचा वापर करावा. अशा प्रकारच्या मोहिमा भविष्यातही सुरूच राहतील, असा इशारा प्रशासनाने दिला .

# चांगतपुरी रेती घाटावर नियमांची पायमल्ली; मशीनद्वारे बेकायदेशीर उपसा सुरू, प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष!

**आत्ताच एक्सप्रेस**
**आष्टी/(प्रतिनिधी)** परतूर तालुक्यातील चांगतपुरी रेती घाटावर सध्या नियमांची अक्षरशः ऐशीतैशी केली जात आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांना केराची टोपली दाखवून गुत्तेदाराकडून यंत्रांच्या सहाय्याने रात्रंदिवस अवैध उपसा सुरू असून, याकडे महसूल प्रशासनाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा गंभीर आरोप होत आहे. या भ्रष्ट कारभाराविरोधात आता राजकीय आणि सामाजिक संघटनांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देण्याचा निर्णय घेतला असून १ मार्च २०२६ पासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

**१ मार्चपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा; वंचित बहुजन आघाडीसह महाविकास आघाडी आक्रमक**

**यंत्रांचा धुमाकूळ आणि पर्यावरणाचा ऱ्हास**

शासकीय नियमानुसार रेती घाटावर केवळ मजुरांच्या मदतीने रेती भरण्याचे बंधन आहे. मात्र, चांगतपुरी घाटावर मजुरांऐवजी पोकलेन, जेसीबी आणि बोटींचा सर्रास वापर केला जात आहे. नदीपात्रात पाणी असतानाही अनधिकृतपणे उपसा करून पर्यावरणाची मोठी हानी केली जात आहे. विशेष म्हणजे, घाटावर पोहोचण्यासाठी जो रस्ता तयार करण्यात आला, त्यामध्ये वापरलेल्या हजारो ब्रास मुरूमाची कोणतीही रॉयल्टी भरलेली नसल्याची माहिती समोर आली आहे.

**दडपशाही आणि 'सीसीटीव्ही'चा पत्ता नाही!**

पारदर्शकता राखण्यासाठी घाटावर सीसीटीव्ही कॅमेरे लावणे अनिवार्य आहे, परंतु गुत्तेदाराने अद्याप अशी कोणतीही सोय केलेली नाही.

इतकेच नव्हे तर, या अवैध कामाची पाहणी करण्यासाठी जाणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना गुत्तेदाराच्या गुंडांकडून शिवीगाळ, दमदाटी आणि मारहाणीचे प्रकार घडत आहेत. यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.



> शासकीय नियमांची पायमल्ली करून पर्यावरणाची लूट केली जात आहे. प्रशासनाला वारंवार कळवूनही जर कारवाई होत नसेल, तर आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही. १ मार्चपासून आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहोत.
>
> **- रामप्रसाद किसनराव थोरात**
> **(जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, जालना)**

**प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात?**

या सर्व प्रकाराबाबत स्थानिक तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना वारंवार फोटो आणि व्हिडिओ पुराव्यासह तक्रारी करण्यात आल्या आहेत.

तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई का होत नाही? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अधिकाऱ्यांचे गुत्तेदाराशी संगनमत असून त्यांच्या 'मेहेरबानी' मुळेच हा लुटीचा खेळ सुरू आहे, असा थेट आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या:

चांगतपुरी घाटावरील मशिनरीद्वारे होणारा उपसा तातडीने थांबवावा.

नियम मोडणाऱ्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करण्यात यावा.गेल्या ८ दिवसांतील आष्टी बसस्थानक आणि मोंढा ढ-पॉईंटचे सीसीटीव्ही फुटेज तपासून बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांवर गुन्हे दाखल करावेत.रस्त्यासाठी वापरलेल्या बेकायदेशीर मुरूमाचा दंड वसूल करावा.

या निवेदनावर रामप्रसाद थोरात (वंचित बहुजन आघाडी), महेश नळगे (शिवसेना उबाठा जिल्हाध्यक्ष), सिद्धेश्वर सोळंके (उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस) आणि पंजाबराव देशमुख (सामाजिक कार्यकर्ते) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रती महसूल मंत्री, विभागीय आयुक्त आणि पोलीस प्रशासनाला पाठवण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास १ मार्चपासून जालना जिल्ह्यात वाळू माफिया आणि प्रशासकीय संगनमताविरोधात मोठा जनक्षोभ उसळण्याची शक्यता आहे.

# जालना महानगरपालिकेचा ॲक्शन मोड

## छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरातील धोकादायक इमारतींवर चालला बुलडोझर

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी/** शहरातील नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत जालना शहर महानगरपालिकेने आजपासून अत्यंत जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या इमारती निष्कासित करण्याची धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात आज सकाळी छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरातील महापालिकेच्या मालकीची एक जुनी आणि धोकादायक इमारत जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली.

जालना महानगरपालिका क्षेत्रात अनेक वर्षांपासून काही शासकीय आणि महापालिकेच्या मालकीच्या इमारती दुर्लक्षित अवस्थेत होत्या. पावसाळा जवळ येत असताना किंवा वाऱ्या-पावसामुळे या इमारती कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. ही गंभीर बाब लक्षात घेऊन महानगरपालिका प्रशासनाने या जीर्ण इमारतींची यादी तयार केली होती.

आज सकाळी महानगरपालिकेचे पथक, तांत्रिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा ताफा छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरात दाखल झाला. पोलीस बंदोबस्तात आणि खबरदारीचे उपाय म्हणून परिसर रिकामा करून जेसीबीच्या सहाय्याने ही मोडकळीस आलेली मालमत्ता पाडण्यात आली.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी पाऊल

या कारवाईबाबत बोलताना प्रशासकीय सूत्रांनी सांगितले की,अपघात टाळणे: सार्वजनिक ठिकाणी असलेल्या या इमारती



कधीही कोसळू शकत होत्या, ज्यामुळे तिथे येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना धोका होता.स्वच्छता आणि सुशोभीकरण: या मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये कचरा आणि अस्वच्छता वाढत होती. या कारवाईमुळे आता तो परिसर मोकळा आणि सुरक्षित झाला आहे.

**मोहीम सुरूच राहणार:** शहरातील इतर भागांतील अशाच प्रकारच्या धोकादायक खाजगी आणि सार्वजनिक इमारतींना आधीच नोटिसा बजावण्यात आल्या असून, ही मोहीम यापुढेही तीव्र करण्यात येणार आहे.

महानगरपालिकेने शहरातील इतर जुन्या आणि धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या किंवा त्यांचा वापर करणाऱ्या नागरिकांना स्वतःहून अशा इमारती रिकामी करण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडू नये यासाठी महापालिका आता आक्रमक पाऊले उचलत असल्याचे आजच्या कारवाईवरून स्पष्ट झाले आहे.

या कारवाईमुळे परिसरात काही काळ बघ्यांची गर्दी जमली होती, मात्र कोणताही अनुचित प्रकार न घडता ही इमारत जमीनदोस्त करण्यात आली.

# कलबुर्गी ते हजरत निजामुद्दीन दरम्यान विशेष 'सुपरफास्ट' गाडी धावणार!

**आत्ताच एक्सप्रेस**
**कलबुर्गी/परभणी/**रेल्वे प्रवाशांची अतिरिक्त गर्दी आणि प्रवासाची वाढती मागणी लक्षात घेता, मध्य रेल्वेने कलबुर्गी ते हजरत निजामुद्दीन (दिल्ली) दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कर्नाटक, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या विशेष गाडीचे सविस्तर वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे:

१. गाडी क्र. ०१३०१ (कलबुर्गी ते हजरत निजामुद्दीन विशेष)

प्रस्थान: ही गाडी कलबुर्गी स्थानकावरून २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०६.०० वाजता सुटेल.




आगमन: हजरत निजामुद्दीन येथे दुसऱ्या दिवशी म्हणजेच २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री २३.३० वाजता पोहोचेल.

२. गाडी क्र. ०१३०२ (हजरत निजामुद्दीन ते कलबुर्गी विशेष)

प्रस्थान: परतीच्या प्रवासासाठी ही गाडी हजरत निजामुद्दीन येथून ०१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.१० वाजता सुटेल.

आगमन: कलबुर्गी येथे ०३ मार्च २०२६ रोजी सकाळी ०८.३० वाजता पोहोचेल.

मार्गावरील प्रमुख थांबे

ही गाडी प्रवासादरम्यान महाराष्ट्र आणि उत्तर भारताला जोडणाऱ्या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबणार आहे.महाराष्ट्र: लातूर रोड, परळी वैजनाथ, परभणी, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला.

**इतर महत्त्वाची स्थानके:** बिदर, खंडवा, इटारसी, राणी कमलापती (भोपाळ), बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ग्वाल्हेर, धौलपूर, आग्रा कॅन्ट, मथुरा आणि पलवल.

प्रवाशांनी या विशेष गाडीच्या आरक्षणासाठी रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाला (IRCTC) भेट द्यावी किंवा रेल्वे स्थानकावरील आरक्षण खिडकीवर संपर्क साधावा.

**लोकभावनांचा 'चक्काचूर'!**

# २० कोटींचा निधी अन् कामाचा दर्जा 'भंगार'; आन्वा-पारध रस्ता कामावरून नागरिकांचा संताप

**आत्ताच एक्सप्रेस**
**भोकरदन / सोपान प्र. सपकाळ/** शासकीय योजनांचा पैसा म्हणजे जनतेच्या घामाचा पैसा! पण भोकरदन तालुक्यातील आन्वा-जळगाव सपकाळ-हिसोडा-पारध या रस्त्याच्या कामात या पैशाची अक्षरशः धूळधाण उडवली जात असल्याचे चित्र आहे. सी.आर.एफ. (CRF) योजनेंतर्गत तब्बल २० कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर झाल्याच्या पोस्ट सोशल मीडियावर फिरवून लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभाग पाठ थोपटून घेत असताना, प्रत्यक्ष कामाचा दर्जा पाहून मात्र नागरिकांनी कपाळाला हात लावला आहे.

**गाजावाजा मोठा, पण कामात 'खोचा'!**

या रस्त्याच्या सुधारणेसाठी मोठा गाजावाजा करण्यात आला. आता रस्ता चकाचक होणार या आशेवर असलेल्या ग्रामस्थांच्या आनंदावर विरजण पडले आहे. प्रत्यक्ष कामाला सुरुवात होताच संबंधित एजन्सीकडून अत्यंत निकृष्ट आणि बोगस पद्धतीने काम रेटले जात असल्याची चर्चा संपूर्ण परिसरात रंगली आहे. रस्ता टिकणार की पहिल्याच पावसात वाहून जाणार? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**चर्चा तर होणारच: सोशल मीडियापासून पारापर्यंत संताप**

रस्त्याच्या कामातील हलगर्जीपणा लपून राहिलेला नाही. गावाच्या पारावरील गप्पा असोत, गल्लीबोळातील चर्चा असो की सोशल मीडियावरील पोस्ट, प्रत्येक ठिकाणी या बोगस कामाचे वाभाडे काढले जात आहेत. 'सरकारी काम आणि सात महिने थांब' असे न होता, 'सरकारी काम आणि दर्जाचे काय?' असा प्रश्न जनता विचारत आहे.

नागरिकांचे मुख्य आक्षेप आणि मागण्या:

निकृष्ट दर्जा: खडीकरण आणि डांबरीकरणाच्या कामात नियमांना हरताळ फासला जात असल्याचा आरोप.

कामाचा वेग व नियोजन: कामात पारदर्शकता नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम.

**प्रशासनाचे दुर्लक्षः** कोट्यवधींचा निधी खर्च होत असताना संबंधित विभागाचे अधिकारी डोळे झाकून बसले आहेत का? असा प्रश्न विचारला जात आहे.आम्हाला केवळ रस्ता नको, तर तो दर्जेदार आणि टिकणारा हवा आहे. २० कोटी रुपये खर्च करूनही जर रस्ता काही दिवसातच उखडणार असेल, तर या निधीचा उपयोग काय? - परिसरातील संतप्त नागरिक

**आता तरी 'साहेबांनी' लक्ष द्यावे!**

केवळ फोटो काढून आणि निधीच्या आकड्यांचा फुगा फुगवून विकास होत नसतो. या रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे आणि कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालावा, हीच परिसरातील जनतेची रास्त अपेक्षा आहे. जर कामाच्या



दर्जात सुधारणा झाली नाही, तर हा रोष आंदोलनाच्या स्वरूपात रस्त्यावर उतरण्यास वेळ लागणार नाही.

# पैठणमध्ये वृक्षतोडीचा भांडाफोड करणाऱ्या पत्रकारांना 'सुपारी' देऊन धमकावल्याचा प्रकार; वन विभागाच्या भूमिकेवर संशय

**धक्कादायक!**

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण/ विशेष प्रतिनिधी/** जायकवाडी उत्तर येथील शासकीय वसाहतीमधील वृक्षसंपदेची बेसुमार कत्तल करणाऱ्या भूमाफिया आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचे संगनमत आता उघडकीस येत आहे. या बेकायदा वृक्षतोडीवर आवाज उठवणाऱ्या पत्रकारांना थेट गुंडांकरवी धमकावण्याचे सत्र सुरू झाले असून, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनीच पत्रकारांना गप्प करण्यासाठी गुंडांना सुपारी दिली आहे का? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

नंदनवनाचे केले वाळवंट!

तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. टिपरे यांनी अत्यंत कष्टाने या वसाहतीमध्ये विविध जातींच्या वृक्षांची लागवड करून हे परिसर 'नंदनवन' बनवले होते. पर्यटकांना भुरळ घालणारा हा परिसर आज काही 'बुद्धीशून्य' स्थापत्य अभियंत्यांच्या विकासकामांच्या नावाखाली उजाड झाला आहे. निसर्गाचे भान नसलेल्या या अधिकाऱ्यांनी वर्षानुवर्षे उभी असलेली झाडे जमीनदोस्त करून या परिसराचे वाळवंट केले आहे.

तक्रारदारांवरच उलटले प्रशासन?

या गंभीर वृक्षतोडीची माहिती जेव्हा सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनी वन विभागाला दिली, तेव्हा अपेक्षित कारवाई होण्याऐवजी धक्कादायक प्रकार समोर आला. वन विभागाने लाकूडतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी, बातम्या प्रकाशित करणाऱ्या पत्रकारांची माहिती संबंधित गुंड प्रवृत्तीच्या लोकांना पुरवल्याचा संशय व्यक्त होत आहे.

एकीकडे शासन कोट्यवधी रुपये खर्च करून झाडे लावण्याचे आवाहन करते, तर दुसरीकडे पैठणमध्ये अधिकारी आणि लाकूडमाफियांची 'अभद्र युती' निसर्गाचा गळा घोटत आहे.



**फोनवरून धमक्यांचे सत्र**

वृक्षतोडीच्या बातम्या प्रसिद्ध होताच, पत्रकारांना गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून फोनवरून धमकावण्यात येत आहे. ही धमकीची भाषा आणि गुंडांचे वाढलेले धाडस पाहता, यामागे वन विभागाच्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचा वरदहस्त असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. आपल्या भ्रष्टाचाराचे वाभाडे निघू नये म्हणून अधिकाऱ्यांनी गुंडांना सुपारी देऊन पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू केल्याने तालुक्यात खळबळ माजली आहे.

**आता लढा पोलिसात!**

पत्रकार संरक्षण कायद्याची पायमल्ली करणाऱ्या या प्रवृत्तींविरोधात पैठणमधील पत्रकार संघटना आक्रमक झाली आहे.

या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई न झाल्यास, हे संपूर्ण प्रकरण पोलिसात नेण्याचा आणि तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पत्रकार संघाने दिला आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी जिंकली प्रेक्षकांची मने; पिठोरी सिरसगाव शाळा स्नेहसंमेलनाला गावकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)** तालुक्यातील नुतन वसाहत पिठोरी सिरसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि ग्रामस्थांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात चिमुकल्यांच्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे, प्रत्येक सादरीकरणाला दाद देत गावकऱ्यांनी बक्षिसांचा वर्षाव केला, ज्यातून शाळेला ४० हजार रुपयांचा निधी जमा झाला आहे.

**बक्षीसापोटी जमा झाली ४० हजारांची रक्कम; 'नुतन वसाहत' शाळेचा उपक्रम उत्साहात संपन्न**

**मान्यवरांची उपस्थिती आणि सोहळ्याचे उद्घाटन**

कार्यक्रमाचे उद्घाटन गावातील व परिसरातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर खालील मान्यवर उपस्थित होते.सरपंच: कृष्णा भाऊ आटोळे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष: राजेंद्र भाऊ पवार,प्रशासकीय अधिकारी: शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे, केंद्रप्रमुख दत्ता भापकर, झांबरे ,राजकीय व सामाजिक नेतृत्व: भाजप युवा नेते विजय खटके, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष किशोर तुपे, शिवसेना (उ.बा.ठा.) तालुकाप्रमुख बाळासाहेब गावडे, राष्ट्रवादी युवा नेते जगन्नाथ उढाण, भाजप तालुकाध्यक्ष प्रेमानंद उढाण, आदर्श शिक्षक राजू छल्लारे, माजी सरपंच रामेश्वर माने, अर्जुन येवले, बाबू मुळे, ग्रामपंचायत सदस्य गणेश काकडे, प्रकाश खारतुडे, संतोष खारतुडे, ग्रामसेवक चव्हाण, संभाजी खोमणे, शांतीलाल खारतुडे आदी.

**शाळेच्या गुणवत्तेचा आढावा**

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक अशोक शिंदे यांनी शाळेच्या प्रगतीचा आलेख मांडला. शाळेत राबवले जाणारे उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता आणि स्नेहसंमेलनासारख्या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी होणारे प्रयत्न यावर त्यांनी प्रकाश टाकला. मुख्याध्यापक शिंदे यांनीच कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले, तर शिक्षक सुनील जोगदंड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गीते आणि लोकनृत्यांवर बहारदार सादरीकरण केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख श्री. काकासाहेब नलवडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराचे सर्वांनी कौतुक केले. पालकांनी आपल्या पाल्यांचा उत्साह पाहून टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.




उत्कृष्ट नियोजनामुळे हा कार्यक्रम परिसरातील चर्चेचा विषय ठरला आहे.या स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अशोक शिंदे, शिक्षक सुनील जोगदंड, काकासाहेब नलवडे आणि शालेय कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आणि ग्रामस्थांच्या दातृत्वाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813